श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी, २०२६ करीता पालखीत सहभागी होणाऱ्या भाविकांना आरोग्य सेवा उपलब्ध देण्याकरीता आवश्यक औषधी साहित्य खरेदी व पालखीच्या नियोजनाकरिता लेखाशिर्ष २२१० ०१४६ अंतर्गत सहायक अनुदान **वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-१२२६/प्र.क्र.११८/खरेदी कक्ष (ई.१७२१२२०)
गो.ते.रुग्णालय संकूल इमारत, नवीन मंत्रालय,
लो.टि.मार्ग, मुंबई - ४००००१.
दिनांक : १७ जुलै, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७.०४.२०२५
२) सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर),मुंबई यांचे पत्र क्र.आसेआ/कक्ष-३/टे-४/ई-नस्ती क्र.१२०११७/पंढरपूर आषाढी वारी २६/८६५७-५९/२०२६, दि.२२.०६.२०२६
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.११८/खरेदीकक्ष, दि. २५.०६.२०२६
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२६/प्र.क्र.१२०/खरेदीकक्ष, दि.२९.०६.२०२६

प्रस्तावना:-

वाचा मधील अ.क्र. २ येथील दिनांक २२.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी, २०२६ करीता पालखीत सहभागी होणाऱ्या भाविकांना आरोग्य सेवा उपलब्ध देण्याकरीता आवश्यक औषधी साहित्य खरेदी व पालखीच्या नियोजनाकरिता लेखाशिर्ष २२१० ०१४६ अंतर्गत २१-पुरवठा व सामुग्री, १३-कार्यालयीन खर्च व २४-पेट्रोल, तेल व वंगण या उद्दिष्टातंर्गत एकूण रुपये ९,९४,३०,०००/- इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास वाचा क्र.३ येथील दिनांक २५.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच श्री. क्षेत्र पंढरपूर येथे महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यासाठी रुपये १,५०,००,०००/- इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास वाचा क्र.४ येथील दिनांक २९.०६.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी, २०२६ करीता पालखीत सहभागी होणाऱ्या भाविकांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक औषधी साहित्य खरेदी व पालखीच्या नियोजनाकरिता वित्त विभागाने लेखाशीर्ष २२१० ०१४६, २१-पुरवठा व सामुग्री या उद्दिष्टाखाली २९ टक्केच्या मर्यादेत उपलब्ध करुन दिलेला रुपये ४.६५ कोटी

इतका निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करुन खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात पालखी सोहळा व श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी, २०२६ करीता पालखीत सहभागी होणाऱ्या भाविकांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक औषधी साहित्य खरेदी करण्याकरीता लेखाशीर्ष २२१० ०१४६, २१-पुरवठा व सामुग्री या उद्दिष्टाखाली रुपये ४,६५,००,०००/- (अक्षरी चार कोटी पासष्ट लाख फक्त) इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करुन वाचा क्र.३ येथील दि.२५.०६.२०२६ च्या शासन निर्णयात नमूद बाबींवर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच, श्री. क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी वारी, २०२६ करीता महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्या साठी वाचा क्र.३ व ४ येथील शासन निर्णयात नमूद बाबींकरीता लेखाशीर्ष २२१० ०१४६, १३-कार्यालयीन खर्च व २४- पेट्रोल, तेल व वंगण या उद्दिष्टाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीपैकी शिल्लक तरतूद ही मंजूर बाबींवर प्रथम खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत सहायक अनुदानाची देयके कोषागारातून आहंरीत करण्यासाठी "प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे" यांना "आहंरण व संवितरण अधिकारी" व "उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे" यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला निधी मंजूर बाबींवर खर्ची पडल्यानंतर सदरील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

५. या कामी होणारा खर्च, "मागणी क्र. आर-१, ११०, रुग्णालये व दवाखाने (०१) मुफसल रुग्णालये व दवाखाने, (०१) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (अनिवार्य), २१-पुरवठा व सामग्री, १३-कार्यालयीन खर्च व २४-पेट्रोल, तेल व वंगण (२२१० ०१४६)" या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतुन भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ मधील तरतूद तसेच, वाचा क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दि.०७.०४.२०२५ मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांस प्रदान करण्यात आलेले अधिकार तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१७/२०२६/व्यय-१३, दिनांक ०७.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७१७५३५३१४१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.07.17 18:28:21 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
४) सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा,(असंसर्गजन्य रोग), मुंबई
६) सह संचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
७) सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
८) उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
९) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पुणे
१०) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर
११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षण/लेखा अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.
१२) वित्त विभाग (व्यय-१३/अर्थ-९), मंत्रालय, मुंबई.
१३) सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६) निवडनस्ती (खरेदी कक्ष)